# <u>जाहिरात</u>

वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ८३(४) येथील सुधारित तरतूदीनुसार त्रिसदस्यीय वक्फ न्यायाधिकरणाची स्थापना करण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे. उपरोक्त अधिनियमातील कलम ८३(४)(ब) येथील तरतूदीनुसार "राज्य नागरी सेवेतील अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी दर्जाचा अधिकारी असलेल्या एका व्यक्तीची त्रि-सदस्यीय वक्फ न्यायाधिकरणावर सदस्य म्हणून नियुक्ती करावयाची आहे. सदर पदाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत -

१) सदर महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाचा सदस्य हा अल्पसंख्याक विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्राणाखाली असेल.

२) नियुक्त सदस्याचा कार्यकाळ हा त्याने आपल्या पदावर प्रत्यक्ष रुजू झाल्याच्या दिनांकापासून ५ वर्ष असा असेल.

३) सदर पदाची वेतनश्रेणी १५,६००-३९,१००+ग्रे.पे.७,६०० अशी आहे आणि वर्ग-अ च्या शासकीय अधिकाऱ्यांना लागू असलेले भत्ते त्यांना अनुज्ञेय असेल.

४) सदर न्यायाधिकरणाचे मुख्यालय, औरंगाबाद येथे असेल.

वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकणावर सदस्य म्हणून काम करण्यास इच्छूक असलेल्या अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाच्या व उपरोक्त पात्रता धारण करणाऱ्या शासनाच्या इतर कोणत्याही विभागातील इच्छूक अधिकाऱ्याकडून अर्ज मागविण्यात येत आहे. उपरोक्त पात्रता धारण करणाऱ्या आणि प्रतिनियुक्ती काम करु इच्छिणाऱ्यांनी विहित मार्गाचा अवलंब करुन दि.३०.०३.२०१७ पूर्वी निश्चितपणे पोहचतील अशा बेताने **प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय (विस्तार), मुंबई- ४०० ०३२** यांच्याकडे सर्व वैयक्तिक तपशीलासह (Bio-Data) अर्ज सादर करावा. तद्नंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

वर नमूद केल्याप्रमाणे करण्यात आलेले कोणतेही किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे सर्व अधिकार शासनाकडे अबाधित आहेत.

सही/-
प्रधान सचिव,
अल्पसंख्याक विकास विभाग